प्रेस नोट ०२ दिनांक २५/०१/२०२४

''अफवा पसरवून जनतेमध्ये भिती निर्माण करणा-या दोन इसमांविरुध्द गुन्हा दाखल केलेबाबत''

दिनांक २४/०१/२०२४ रोजी ट्रॉम्बे पोलीस ठाणेस अफवा पसरविणारा व्हिडीओ व्हॉट्सअप ॲप द्वारे पसविण्यात येत असल्याची माहिती मिळाली.

सदर माहिती प्राप्त होताच नागरिकांमध्ये भिती व असुराक्षितेची भावना निर्माण होवू नये म्हणून ट्रॉम्बे पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री अनंत शिंदे यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे मदतीने तात्काळ अफवा पसरविणारा व्हिडीओ व्हायरल करणारा इरफान इब्राहिम शेख, वय ३० वर्षे, राठी- चिता कॅम्प, ट्रॉम्बे, मुंबई व विजय पांडूरंग सांडगे, वय ४२ वर्षे,राठी- अमरनगर, ट्रॉम्बे, मुंबई यांस ताब्यात घेण्यात आले असून त्यांचेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोउनि भोई करीत आहेत.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ६, मुंबई श्री हेमराजसिंह राजपूत यांचेकडून परिसरातील नागरिकांना आवाहन करण्यात येते कि, सोशल मिडीयावर अफवा पसरविणा-या व धार्मिक/ जातीय तेढ निर्माण करणारे आक्षेपाई फोटोज, व्हिडीओ, स्टेट्स कोणीही पोस्ट करू नयेत. अशा फोटोज, व्हिडीओ, स्टेट्स बाबत नागरिकांनी दक्षता घेवून सदर पोस्ट व्हायरल न करता त्याची माहिती पोलीसांना दयावी. सोशल मिडीयावर असे आक्षेपाई फोटोज, व्हिडीओ, स्टेट्स पोस्ट करणा-यांविरोधात कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

--------